महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रयका/न.क्र.१/ ८९३९
प्रकाशगड, वैद्युत विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.९, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

दिनांक : २०/०३/२०२०

# परिपत्रक

**विषय : करोना विषाणू (COVID-19) रोगाचा प्रसार टाळण्यासाठी कृतीशिल उपाय.**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४ दि. १६.०३.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासं/रयका/न.क्र.१/७५८१ दि. ०५.०३.२०२०.
३) परिपत्रक क्र. मासं/रयका/न.क्र.१/८५५९ दि. १७.०३.२०२०.
४) परिपत्रक क्र. मासं/रयका/न.क्र.१/८७४९ दि. १८.०३.२०२०.
५) शासन निर्णय क्र. समय -२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व का.) दि. २०.०३.२०२०.

महाराष्ट्र राज्यामध्ये करोना विषाणूचा (COVID-१९) वाढता प्रसार विचारात घेता व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महावितरण कंपनीमध्ये कृतीशिल उपाय म्हणून सर्व प्रशासकीय कार्यालयातील नियंत्रण अधिकारी, कंपनीच्या दैनंदिन कामकाजास व संचलन कार्यक्षमतेस (Operational Efficiency) कुठेही बाधा येणार नाही, याची खबरदारी घेऊन त्यांच्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी ५०% कर्मचाऱ्यांना, दि. ३१.०३.२०२० पर्यंत "घरून काम (Work From Home)" करण्यास संदर्भित क्र. ४ मधील परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.

२. तथापि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अधिक तातडीची उपाययोजना म्हणून खालीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत.

अ) मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर शहर येथील, महावितरण कंपनीच्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती २५ टक्के ठेवण्यात यावी. यासाठी या क्षेत्रातील कंपनीच्या संबंधित कार्यालय प्रमुख यांनी तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी.

ब) तथापि, परिच्छेद २-अ येथे नमूद केलेल्या क्षेत्रामधील कंपनीच्या कार्यालयांमधील अत्यावश्यक सेवा देणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

क) संदर्भ क्र. ४ अन्वये प्रसारीत करण्यात आलेल्या इतर सूचना अबाधित राहतील.

३. सदर परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Scanned with CamScanner